पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, यांचे कार्यालय.
चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे -४११००८
दुरध्वनी क्रमांक - (०२०)२५६५७८७८/ फॅक्स - २५६७४६४१
ई मेल आय.डी.-localcrimebranchpuner@gmail.com



खेड परीसरात गुन्हेगारी टोळीसह दहशत करुन,वर्चस्व प्रस्थापित करुन खंडणी मागणी करणारा कुख्यात गुंड मयुर तानाजी हजारे व त्याचे टोळीवर मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर, यांचेकडुन मोक्का कायदयांतर्गत गुन्हयास मंजुरी

खेड पोलीस स्टेशन गु.रजि.नं 263/2025 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 109(1),308(4),324(4), 189(1),190, 191(2), 191(3),191(2), 115(2), 351(2),351(3),352 सह आर्म ॲक्ट 3,25,27 प्रमाणे दिनांक 11/05/2025 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मौजे गोसासी ता.खेड जि.पुणे गावचे हददीत दिनांक 10/05/2025 रोजी रात्रौ 11/00 वाजणेचे सुमारास हॉटेल दुर्वांकुर मध्ये हॉटेज मालक यांनी आरोपी मयुर तानाजी हजारे, अक्षय बबन हजारे, मंगेश दौंडकर, गणेश दिलीप गोरडे, बंटी डफळ व त्यांचे अनोळखी सहकारी आरोपी यांनी केलेल्या जेवणाचे बिलाची मागणी केली याचा राग येवुन अक्षय बबन हजारे याने बेल्ट काढुन बेल्टने मारहाण करण्याची धमकी दिली होती. त्यानंतर पुन्हा दिनांक 11/05/2025 रोजी रात्रौ 12/30 वाजणेचे सुमारास फिर्यादी व फिर्यादीचे भाऊ असे सर्वजण हॉटेल दुर्वांकुर चे समोर पार्कींग मध्ये थांबले असताना तेथे मयुर तानाजी हजारे, अक्षय बबन हजारे, मंगेश दौंडकर, गणेश दिलीप गोरडे, बंटी डफळ व त्यांचे अनोळखी सहकारी आले व त्यापैकी मयुर हजारे व अक्षय हजारे यांनी फिर्यादीचे भावास तुझे हॉटेलचा धंदा चांगला होतो, तु आम्हाला हप्ता चालु कर, नाहीतर तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणुन खंडणीची मागणी केली व तिस फिर्यादी यांनी नकार दिल्यामुळे मयुर हजारे याने त्याचेकडे असलेल्या पिस्तुलमधुन फिर्यादीचा भाऊ याचेवर दोन वेळा फायर करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. सदर घटनेबाबत निलेश रोहिदास गोरडे वय वर्षे 32 व्यवसाय.हॉटेल रा.गोसासी, ता.खेड जि.पुणे यांनी खेड पोलीस स्टेशन येथे वरीलप्रमाणे फिर्याद नोंदविली होती.

सदर गुन्हयामध्ये कुख्यात गुंड मयुर तानाजी हजारे याचा व त्याचे गुन्हेगारी टोळीचा सहभाग असल्याने सदर गुन्हयाचा तपास खेड पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण कडुन संयुक्त रित्या वरीष्ठांचे आदेशाने सुरु करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे कामी एकुण 10 आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न करीत त्यापैकी आरोपी नामे (1) राहुल ऊर्फ बंटी साहेबराव डफळ वय वर्षे 35 रा.धामारी ता.शिरुर जि.पुणे 2) गणेश दिलीप गोरडे वय वर्षे 23 रा.पुर ता.खेड जि.पुणे 3) मंगेश विलास दौडकर वय वर्षे 35 रा.कनेरसर ता.खेड जि.पुणे 4) स्वप्नील रोहिदास गावडे वय वर्षे 30 रा.पुर ता.खेड जि.पुणे 5) रोहित रविंद्र दौंडकर वय वर्षे 25 रा. कनेरसर ता.खेड जि.पुणे 6) गणेश दत्तात्रय गावडे वय वर्षे 23 रा.पुर ता.खेड जि.पुणे 7) शुभम शिवाजी हजारे वय वर्षे 21 रा.कनेरसर ता.खेड जि.पुणे 8) गौरव राम हजारे वयवर्षे 20 रा. कनेरसर ता.खेड जि.पुणे याचा शोध घेवुन त्यांना गुन्हयाचे तपासकामी ताब्यात घेवुन अटक करण्यात आलेली आहे. तसेच मुख्य आरोपी 1) मयुर तानाजी हजारे रा. कनेरसर ता.खेड जि.पुणे 2) अक्षय बबन हजारे रा. कनेरसर ता.खेड जि.पुणे हे दोघे फरारी आहेत. एकुण 10 आरोपींविरुध्द मा.न्यायालयात पो.निरी श्री.सुभाष चव्हाण खेड पोलीस स्टेशन यांनी दोषारोपपत्र दाखल केलेले आहे.

सदर गुन्हयातील कुख्यात टोळीवर पुणे ग्रामीण जिल्हयामध्ये शिक्रापुर व खेड पोलीस स्टेशनमध्ये बेकायदेशीर गर्दी जमाव जमवुन अवैध अग्नीशस्त्राचा वापर करुन खुन करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन घातक हत्यारांनी जबर दुखापत पोहचविणे, बेकायदेशीर जमाव जमवुन बेकायदेशीर अग्नीशस्त्राचा वापर करुन खंडणीची मागणी करणे व जीवे मारण्याचा प्रयत्न करणे व मालमत्तेचे नुकसान करणे असे एकुण 7 गुन्हे दाखल असल्याने सदर टोळीवर कायदयाचा वचक रहावा व त्यांची दहशत असणारे परीसरात शांतता प्रस्थापित व्हावी या दृष्टीकोनातुन **मा. श्री. सुनिल फुलारी सो, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर** यांनी वरील नमुद गुन्हयाचे कागदपत्रांचे पडताळणी करुन नमुद गुन्हयातील संघटीत टोळीविरोधात मोक्का कायदयांतर्गत कारवाई करणेकरीता कायदेशीर तरतुदींचे अधीन राहुन प्रस्ताव सादर करण्याचे सुचना केल्या होत्या.

कुख्यात गंड मयुर तानाजी हजारे व त्याचे गुन्हेगारी टोळीतील सदस्य यांचे विरोधात वरील दाखल गुन्हयास पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी मोक्का कायदयांतर्गत लागु होणारे कलमांची वाढ करणेकरीता वरिष्ठ कार्यालयात प्रस्ताव सादर केलेला होता. त्याप्रमाणे मा. श्री. सुनिल फुलारी सो, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर यांनी वरील गुन्हयास मोक्का कायदयांतर्गत कलमांची वाढ करणेची सक्षम प्राधिकारी म्हणुन कायदेशीर रित्या परवानगी दिली. त्यानंतर वरील गुन्हयाचा तपास श्री.अमोल मांडवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग, खेड यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे. मा.श्री.सुनिल फुलारी सो,विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर यांनी मागील 2 आठवडयांमध्ये पुणे ग्रामीण पोलीस दलाचे अखत्यारीतील वालचंदनगर, वडगाव मावळ व खेड पोलीस स्टेशन हददीमधील कुख्यांत गुंडांच्या 3 टोळयांवर मोक्का कायदयांतर्गत मंजुरी दिलेली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.संदीप सिंह गिल्ल सो,पुणे ग्रामीण, मा.अपर पोलीस अधीक्षक, श्री. रमेश चोपडे, अपर पोलीस अधीक्षक, पुणे विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, खेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक श्री.सिसोदे, स्थानिक गुन्हे शाखेचे खेड व शिरुर विभागातील तपास पथकाचे पोलीस अंमलदार विक्रमसिंह तापकीर, राजु मोमीण, मंगेश थिगळे, जनार्दन शेळके, तुषार पंदारे, संजु जाधव, खेड पोलीस स्टेशनकडील तपास पथक यांनी केली असुन सहायक पोलीस उपनिरीक्षक महेश बनकर स्थानिक गुन्हे शाखा व श्रेणी पोलीस उपनिरीक्षक शंकर भवारी, पोलीस अंमलदार संदीप लांडे, खेड पोलीस स्टेशन यांनी प्रस्ताव तयार करणेस मदतनीस म्हणुन कामगिरी केलेली आहे.

पुणे ग्रामीण पोलीस